श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-९, अंक-५ | मे-२०२१ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने २० |

## श्रीशिवजयंती सोहळा श्रीक्षेत्र डेरवण

श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीक्षेत्र डेरवण आयोजित श्रीशिवजयंती सोहळा फाल्गुन वद्य तृतीया, शक १९४२, शिवराज्याभिषेक शक ३४७, बुधवार, दि. ३१ मार्च २०२१ रोजी श्रीशिवसमर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षाप्रमाणेच अत्यंत उत्साहाने साजरा झाला. सकाळी ८.३० वाजता सुरू झालेल्या या सोहळ्याचे अध्यक्षस्थान मा. प्रसाद कुलकर्णी यांनी भूषविले तर प्रमुख वक्त्या डॉ. सुजाता शेणई या होत्या.

ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यावर ध्वजप्रार्थना-पठण झाले आणि वे. मू. मंदार फडकेगुरुजी, वे. मू. मिलिंद बोरकरगुरुजी आणि ब्रह्मवृंदाने शांतिसूक्त पठण केले. सभेच्या सूत्रसंचालिका श्रीमती शरयू यशवंतराव यांनी प्रास्ताविक करून सभेचे अध्यक्ष आणि प्रमुख वक्त्या यांचा परिचय करून दिला आणि ट्रस्टतर्फे श्री. विकासराव वालावलकर यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे



*श्रीसहजानंदसरस्वती महाराज आणि भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहताना मा. अध्यक्ष श्री. प्रसाद कुलकर्णी*



*ध्वजपूजन करताना प्रमुख विश्वस्त मा. विकासराव वालावलकर*

स्वागत केले. अन्य वक्ते डॉ. सुवर्णा पाटील, प्रा. सचिन कानिटकर, तसेच डेरवणच्या सरपंच मा. श्रीमती अक्षता मुंढेकर, डॉ. मधुकर जोशी आदींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

ट्रस्ट प्रतिवर्षी आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या काही समाजसेवकांचा सत्कार करतो. आपल्या परिसरातील गोरगरीब रुग्णांना डेरवण रुग्णालयातील आरोग्यसेवेचा लाभ घेता यावा म्हणून त्यांना साहाय्य करणारे श्री. विजय यशवंत पागडे (आबलोली, गुहागर), श्रीमती सुजाता रामचंद्र घडशी (वहाळ) आणि श्री. देवेन्द्र राजेशिर्के (डेरवण) यांचा अध्यक्षांच्या हस्ते चांदीचा प्याला आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून माध्यमिक शाळेत पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या डेरवण परिसरातील मुलींना प्रोत्साहन म्हणून दरवर्षी मनगटी घड्याळे बक्षीस दिली जातात. या वर्षी कु. संस्कृती घाणेकर, कु. ईश्वरी सुर्वे, कु. दिया पाडावे (जि. प. शाळा, डेरवण) आणि कु. जान्हवी तळेकर, कु. रोहिणी वाटले आणि कु. साक्षी मालप (जि. प. शाळा, हडकणी) यांना अध्यक्षांच्या हस्ते ही बक्षिसे देण्यात आली.

यानंतर डेरवण रुग्णालय आणि मेडिकल कॉलेजच्या संचालिका डॉ. सुवर्णा पाटील या बोलायला उभ्या राहिल्या. ट्रस्टने सुरू केलेल्या नर्सिंग तसेच अन्य पॅरामेडिकल क्षेत्रातील नवीन अभ्यासक्रमांविषयी, विशेषत: नव्याने सुरू झालेल्या ‘कॉलेज ऑफ फिजिओथेरपी’विषयी विस्तृत माहिती त्यांनी दिली. इसीजी टेक्निशिअन, रेस्पिरेटरी टेक्निशिअन, ॲनेस्थेशिया असिस्टन्ट असे कोर्सेसही येथे सुरू झाले असून संस्थेच्या सुसज्ज रुग्णालयात या विद्यार्थ्यांना भरपूर प्रशिक्षण आणि अनुभव मिळतो आणि त्यामुळे त्यांना उत्तम रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. करोनाच्या काळात देशभरात आरोग्यसेवेवर विपरित परिणाम झाला पण वालावलकर रुग्णालयात मात्र सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांसह सर्व आरोग्यसेवा सुरळीत सुरू होती. जानेवारीमध्ये नेहमीप्रमाणे महाशिबिर आयोजित करण्यात येऊन सुमारे २५० शस्त्रक्रियाही या कठीण काळात करण्यात आल्या. जरी या वर्षी गेली पंधरा वर्षे येणारे ब्रिटिश डॉक्टरांचे पथक येऊ शकले नाही तरीही या शिबिराला त्यांचे ऑनलाईन मार्गदर्शन मात्र मिळाले.

रुग्णालयात सुरू केलेल्या ‘व्हायरॉलॉजी लॅब’मुळे कोविड, एचआयव्ही, हिपॅटेटीस बी, मलेरिया, डेंग्यू तसेच मेटॅबोलिक

डिस्ऑर्डर आणि जेनेटिक रोगांचे निदान आता कोकणात होणार आहे असे सांगून या लॅबसाठी भरघोस देणगी देणाऱ्या अमेरिकास्थित डॉ. वासुदेव भिडे यांचे त्यांनी आभार मानले. वैद्यकीय विद्यार्थ्यांना मोलिक्युलर बायॉलॉजीची आवड निर्माण व्हावी याकरिता 'मुव्हिंग ॲकॅडेमी ऑफ मेडिसिन ॲन्ड बायोमेडिसिन'चे अध्यक्ष डॉ. माधव देव यांनी 'मोलिक्युलर बायॉलॉजी लॅब' देणगी स्वरूपात दिली आहे. या लॅबमधे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे आणि पुढील संशोधनासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याचे काम डॉ. रीटा मुल्हेरकर या करीत आहेत. त्यांनी कोविडसंबंधी संशोधन करून नवे तंत्रज्ञान डेरवणच्या लॅबमध्ये विकसित केले आहे. शिवाय त्यांनी डॉ. नाडकर्णी यांच्यासमवेत 'Foetal bovine serum' या अत्यंत महागड्या द्रव्याला पर्याय शोधला असून आता त्याचा वापर भारतातील शास्त्रज्ञ करू शकतील. कोविडच्या काळात 'आयजीए'(Secretaory IgA) वर संशोधन करण्यासाठी लागणारा महागडा Jacalin Agarose Gel हा पदार्थ कोकणात सहज उपलब्ध असणाऱ्या फणसाच्या बियांपासून तयार करण्याविषयीही त्यांचे संशोधन सुरू आहे.

याच प्रयोगशाळेत कॅन्सरविषयक संशोधन टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या डॉ. नीलम शिरसाट या करीत आहेत. डॉ. श्रीपाद बाणावली यांनी येथे पूर्ण वेळ मेडिकल ऑन्कॉलॉजिस्ट आणि रेडिएशनल ऑन्कॉलॉजिस्ट यांची पूर्णवेळ नियुक्ती केली आहे. त्यामुळे आता हजारो लोकांना येथेच कॅन्सरविषयक उपचार मिळणार आहेत याची ग्वाही त्यांनी दिली. कोकणातील दीड हजार मुलींचा एक समूह तयार करण्यात आला असून त्यांची लग्ने होऊन त्यांना मुले होऊन ती मोठी होईपर्यंतची पुढील वीस वर्षे त्यांच्या आरोग्याची जबाबदारी संस्थेने घेतली आहे. त्यांच्या आरोग्यविषयक बदलांचे निरीक्षण करून नोंदी ठेवून त्यावर संशोधन होणार आहे. या संशोधनामुळे कोकणातील स्त्रियांच्या आजारांवर उपाययोजना करणे सुलभ होणार आहे. या कार्यक्रमाला पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या सहकार्याने 'राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी कमिशन'कडून भरघोस अर्थसाहाय्य मिळाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

दोन महिन्यांपूर्वी सरकार आणि वालावलकर रुग्णालय यांच्या संयुक्त प्रयत्नांतून 'ॲन्टिरेट्रोव्हायरल थेरपी सेंटर' सुरू झाले असून तेथे 'एच.आय. व्ही. बाधितांना मोफत उपचार करण्याची सोय झाली आहे. महिन्याला एक हजार रुग्णांवर येथे उपचार होऊ शकतील. तसेच टी.बी., कॅन्सर, हृद्रोग आदींवर रुग्णालयात संशोधन सुरू आहे. बजाज फिनसर्व्ह कॅथ लॅब आणि कार्डिॲक सेंटरविषयी



*मा. अध्यक्ष श्री. कुलकर्णी यांचा सत्कार करताना मा. विकासराव वालावलकर*




*प्रमुख वक्त्या डॉ. सुजाता शेणई यांचा सत्कार करताना मा. विकासराव वालावलकर*

माहिती देताना विविध सरकारी योजनांच्या साहाय्याने गरजूंना हृद्रोगावरील महागडे उपचारही आता वालावलकर रुग्णालयात मोफत उपलब्ध आहेत असे त्यांनी सांगितले.

डॉ. सतीश गोरे आणि डॉ. सुनील नाडकर्णी यांनी आयोजित केलेले 'एन्डोस्कोपिक स्पाईन सर्जरीचे वर्कशॉप' आणि त्याला देशभरातील डॉक्टर्सकडून मिळालेला प्रतिसाद, सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. आमडेकर यांची रुग्णालयाला भेट, वैद्यकीय महाविद्यालयात या वर्षी सुरू झालेले नऊ पदव्युत्तर अभ्यासक्रम, अद्ययावत 'गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजी विभाग' आणि तेथे आपली मुंबईची प्रॅक्टिस सोडून कायम वास्तव्यासाठी आलेले डॉ. आनंद जोशी, न्युरॉलॉजी, इन्ट्राव्हेन्शनल रेडिऑलॉजी आदी विभागांचे कार्य, 'द स्पीड प्रोजेक्ट' ही अनोखी जागतिक धावण्याची स्पर्धा, क्रीडासंकुलातील क्रॉसकंट्री स्पर्धा, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत 'सीबीएससी' शिक्षणक्रमाचा अंगीकार, लो. टिळक आणि स्वा. सावरकर यांची स्मारके, वर्षभरात आयोजित विविध प्रबोधनात्मक व्याख्याने आणि उपक्रम अशा विविध उपक्रमांना स्पर्श करीत या सर्व उपक्रमांमुळे डेरवण हे आता 'आनंद वन भुवन' झाले आहे असे त्यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस सांगितले.

यानंतर प्रा. कानिटकर बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, ''गतवर्षी शिवजयन्ती जल्लोषात साजरी झाली आणि नंतर लगेचच लॉकडाऊन झाला आणि या वर्षीची शिवजयन्ती आपण एका वेगळ्या वातावरणात साजरी करीत आहोत. या वर्षी ढोलताशे नाहीत, सभामंचावर श्रीकाकामहाराज उपस्थित नाहीत. खरेतर मला त्यांच्याकडे पाहत बोलायची सवय! त्यामुळे मला आज चुकल्याचुकल्यासारखे होत आहे! त्यांची प्रेरणा असते, ती आपण सगळ्यांनी अनुभवलेली आहे. मी ती शब्दात पकडण्याचा प्रयत्न करतोय! रामायणातील गोष्ट आहे. मारुतिरायांना पकडून रावणासमोर दरबारात उभे केले गेले तेव्हा, 'सीतामाईंना मुक्त करून स्वत:ला विनाशापासून वाचव!' असे मारुतिरायांनी रावणाला सुनावले. तेव्हा, 'हे तू कोणाच्या जिवावर बोलतो आहेस?' असे रावण म्हणाला. मारुतिराय म्हणाले, 'ज्याच्या जिवावर तू सिंहासनावर बसला आहेस त्याच्याच!' मीही आज जे बोलणार आहे ते जरी काकामहाराज येथे उपस्थित नसले तरी त्यांच्या जिवावरच बोलणार आहे.

आजचे आपले जे अध्यक्ष आहेत हे डोंगरदऱ्यातून फिरणारे आहेत आणि त्यांच्या नावावर चार अमेरिकन पेटंट्सही आहेत. शिवजयंतीचा अध्यक्ष चारित्र्यवान हवा असा श्रीकाकांचा कटाक्ष असतो. तसे ते आहेत. ते सोळा देशात फिरून आले आहेत असा त्यांचा परिचय आपण ऐकला. देशाविदेशात त्यांना शिवाजीमहाराजांचा जो अनुभव आला त्याविषयी ते बोलणार आहेत. 'त्याचा वेलू गेला गगनावेरी' शिवाजीमहाराजांच्या कार्याचा वृक्ष जगभर कसा फोफावला याविषयी ते बोलतील. मग मी विचार केला की वृक्ष जसा वर पसरलेला असतो तसा त्याच्या मुळांचा विस्तार जमिनीत




श्रीमती सुजाता रामचंद्र घडशी (वहाळ) यांचा मा. अध्यक्षांच्या हस्ते सत्कार

खालीही पसरलेला असतो. तेव्हा महाराज या मराठी मातीत कसे रुजले आहेत ते मी सांगतो.

आमच्या लहानपणी आम्ही 'शिवाजी म्हणतो --- ' हा खेळ खेळत असे. त्यामध्ये एक मुलगा बाकीच्या मुलांना सांगतो – शिवाजी म्हणतो, 'उठा!' की सर्वांनी उभे राहायचे! 'शिवाजी म्हणतो, 'बसा!' की सर्वांनी बसायचे! जर कोणी अन्य नाव घेऊन आज्ञा केली, उदाहरणार्थ, 'तानाजी म्हणतो, 'बसा!' आणि कोणी ती आज्ञा मानली तर तो बाद! या खेळातून शिवाजीमहाराज लहानपणीच मुलांमध्ये रुजले होते. जे काही शिवाजीमहाराज म्हणतात, ते ऐका, त्यातच तुमचा विजय आहे! आणि नाही ऐकलेत तर तुम्ही हरणार, डाव तुमच्यावर येणार!

मग मी विचार करू लागलो की महाराज असे कुठेकुठे कशाकशातून रुजले आहेत? काव्य, नाटके, सिनेमातून ते रुजले आहेत. भालजी पेंढारकरांनी चित्रपटांची मालिका काढली. तेथपासून आजच्या 'सर्जा', 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय!' पर्यंत अनेक चित्रपट आहेत. अनेक नाटके आहेत. माझ्या सुदैवाने मी शिवाजीमहाराजांवर तमाशा बघितला आहे! त्यात पावनखिंडीतील प्रसंगाचा वग दाखविला होता.

शाहीर लोक सांगतात की पहिला पोवाडा शिवाजीमहाराजांसमोरच झाला. जिजाऊंनी आयोजन केलं होतं. अफझलखानाच्या वधानंतर महाराज चार महिने पन्हाळ्यावर अडकलेले होते. तेथून परतल्यावर त्या विजयाचा आनंद उशिरा साजरा करण्यात आला. त्या वेळी बोलावलेल्या सर्व मानकऱ्यांसमोर अज्ञानदास या शाहिराने 'अफझलखान वधा'चा पोवाडा सादर झाला. म्हणून अज्ञानदासाला आद्य शाहीर म्हणतात. दुसरा एक पोवाडा आहे, धन्य धन्य शिवाजी राजा । शूर महाराजा । सत्य महाराजा जनतेचा । फडकला झेंडा स्वराज्याचा । करीतो आम्ही मानाचा मुजरा हो जी जी जी जी । पोवाडा गाणे म्हणजे कौतुक करणे! आमच्याकडे गोंधळी नावाचा लोकगीतकार असतो. शिवाजीमहाराजांवर गोंधळ !

'गोंधळी गोंधळी न् आम्ही शिवबाचे गोंधळी ।
आमराईतुन आंबा उचलला होता दादोजीनं ।
देशाची संपत्ती चुकुनी नेली हो उचलून ।
अर्धी बाही कापून केले नियमांचे पालन ।
समान होती न्याय प्रतिष्ठा पटतंय काय मंडळी ।
पटतंय काय मंडळी न् आम्ही शिवबाचे गोंधळी ।'

दादोजींनी कसबा पेठ शहाजीराजांच्या नावे वसवली. तेथे बाग लावली. आमराईतील एक पिकलेला आंबा पाहून चुकून मोह झाला आणि आंबा उचलला. मग मनाला लागले की ही राष्ट्राची संपत्ती आहे. ती मी स्वत:साठी वापरली. मग शिक्षा म्हणून त्यांनी आपल्या सदऱ्याची अर्धी बाहीच कापून टाकली. समजा, आजच्या एखाद्या

मंत्र्याने अशी शिक्षा करून घ्यायचे ठरवले तर त्याच्या अंगावर किती कपडे राहतील!

पूर्वी मुली भोंडला किंवा हादगा खेळत. पाटावर हत्ती ठेवून भोवती रिंगण धरून मुली गाणी गातात. भोंडल्याची ठरलेली गाणी आहेत. त्यावरही शिवाजीमहाराजांचे गाणे आहे.

''आदिलशहाच्या दरबारी ग दरबारी ।
सभा बसली सरदारी ग सरदारी ।
आले शहाजी सरदार ग सरदार ।
शिरी पगडी कंगणीदार ग कंगणीदार ।
लवलवून मुजरा करी ग मुजरा करी ।''

प्रसंग असा आहे की शहाजीराजे बाल शिवाजींना घेऊन आदिलशाहच्या दरबारात गेले होते. शहाजीराजांनी मुजरा केला. शिवाजीमहाराजांना मुजरा करण्यास सांगितले. पण शिवाजीराजे जिजाबाईंच्या संस्कारात वाढले होते. या दोघांचेही ठलेले होते की शिवाजीराजांना स्वातंत्र्यासाठी तयार करायचे! स्वातंत्र्य हे शहाजी राजांचे स्वप्न होते आणि त्यांच्या कारकिर्दीत ते पूर्ण होत नव्हते म्हणून मुलाकरवी ते पूर्ण करायचे होते. आणि बापसे बेटा सवाई निकला! आणि काय झाले ते आपणासमोर आहे! मुल तयार झाले आहे की नाही याची परीक्षाही आहे त्यांच्या मनात. आणि त्यांनी सांगितले की बादशहाला मुजरा कर! शिवाजी राजांनी शेवटपर्यंत मुजरा केला नाही! सगळ्यांना भिती वाटली की आता बादशाहा काय करेल?

'उमराव जाहले क्रुद्ध । सुलतान जाहला क्रुद्ध ।
जातीवंत जाहले स्तब्ध । जनकही होत हतबुद्ध ।'

पण शिवाजीमहाराज आईला म्हणतात,

''परि तुझी आणि अंबेची । शिरीं कृपा असावी शुद्ध ।
मावळचे जमून भाई । स्थापीन मराठेशाही ।
हाटवीन आदिलशाही ।
बोलतां सत्य जें गमते, लववेना हें शिर माते ।''

शिवाजीमहाराजांमुळे अनेक वीररसयुक्त कविता निर्माण झाल्या त्यातील ही तिवारींची कविता आहे. ते म्हणतात,

'होतात देउळें नष्ट, होतात देवता भ्रष्ट ।
धेनु ब्राह्मण ओरडती, धर्मावरती संकष्ट ।
न्याय नीति उरली नाही, सारेच भोगिती कष्ट ।
हा घोर मांडिला ज्यांनीं, त्यांचिया पुढे जावोनी,
देशाभिमान सोडोनी ।
प्रेमाच्या मंगल माते ! लववेना हें शिर माते ।'

आपल्याकडे परंपरा सांगते,

'मातृ देवो भव । पितृ देवो भव । आचार्य देवो भव ।'

शिवाजीमहाराज सांगतात, 'आई मी तुझ्या शिकवणीप्रमाणेच वागलो.'

'तू सांग! तुझ्या चरणाशी ही तोडून ठेवीन मान!
तू सांग! तात चरणाशी ही कापून ठेवीन मान!
गोब्राह्मण यांच्या करितां खड्गावर ठेविन मान!
परि परके सत्ताधारी, गृहिं शिरुन झाले वैरी,
बघताच तयांना भारी-।
सक्रोध वृत्ति मम होते, लववेना हें शिर मातें!'

या हादग्यातही हा सर्व भाग आहे. परंतु या कवितेतील वीररस तेथे नाही म्हणून ही कविता तुम्हाला सांगितली. शिवाजीमहाराजांनी उत्तमोत्तम कविता निर्माण करण्यासाठी कवींची प्रतिभा जागृत केली आहे. मग सावरकरांसारखा कवी 'हे हिंदुशक्ति-संभूत दीप्ततम-तेजा' असे गीत लिहितो. मधुकर जोशींच्या 'अशीच अमुची आई असती सुंदर रूपमती' या गाण्यातून कल्याणच्या सुभेदाराची सून ही कथा या गाण्यातून आपल्याला कळते. घराघरात शिवाजीमहाराज कसे रुजलेत बघा!

अंगाई गीत आहे -

''गुणी बाळ असा जागसी कारे वाया । नीज रे नीज शिवराया ।
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई । परि डोळा लागत नाही ।।''

जसे शंकर आपल्यात कणाकणात रुजले आहेत 'कंकरमे शंकर' म्हणतात तसे शिवाजीमहाराज आपल्यात रुजले आहेत. आपण त्यांचा उत्सव करीत असताना या सगळ्याची उजळणी हा भाग महत्त्वाचा आहे. जसे एखादे निरंजन काळवंडलेले असते तेव्हा ते चांदीचे आहे की कसले हे समजत नाही पण आपण ते उजळतो, घासतो तेव्हा ते लखलखीत होते. तशी आपली बुद्धी लखलखीत होण्यासाठी हा उत्सवाचा पायंडा महाराजांनी पाडून दिलेला आहे.

अंगाई प्रमाणेच अनेक लोकगीते आहेत. शेतकरी हा सामान्य समजला जातो. खरेतर शेतकरी हा राजा आहे. पण शेतकऱ्याचा उल्लेख गरीब म्हणूनच केला जातो, अगदी तो हेलिकॉप्टर घेणारा असला तरी! पण तो शेतकरी शिवबांचे गाणे गायचा-

''हे शेतबी माझं, बैल बी माझं जोडी खिलारी ।
हे गाव बी माझं बसून हितं खातो न्याहारी,
रं गड्या खातो न्याहारी ।।
गावमदी समदं गडी हेच बोलती ।
बोलालाबी मोल जसं तसंच चालती ।
शिवाजीच राज्य होणार मोठं इचारी ।
हे गाव बी माझं बसून हितं खातो न्याहारी,
रं गड्या खातो न्याहारी ।।''

हे शेत माझं आहे, हे गाव माझं आहे, हा देश माझा आहे ही भावना पाहिजे! मघाशी मॅडमनी सांगितलं तशी भावना पाहिजे की हा देश माझा आहे, माझ्या घरात जसा मी थुंकत नाही तसा देशातही




*सातवी उत्तीर्ण मुलींना उत्तेजनार्थ बक्षीसे*

बाहेर थुंकणार नाही, तशी भावना पाहिजे! ही भावना शेतकरी या गाण्यातून व्यक्त करतो–

'मायेचाबी पूत येओ झुंज खेळाया ।
नांगराचा फाळ घुसंल मुंडी खुडाया ।
वेशीवरी भगवा झेंडा घेतो भरारी ।
हे गाव बी माझं बसून हितं खातो न्याहारी,
रं गड्या खातो न्याहारी ।।'

वेशीवर भगवा झेंडा आहे, हे स्वराज्य आहे, शत्रू आला तर हातावर हात ठेऊन गप्प बसणार नाही. नांगराच्या फाळाने त्याची मुंडी खुडीन! लोकगीतात सर्वत्र शिवाजीमहाराज भेटतात.

संतांच्या वाङ्मयात शिवाजीमहाराज भेटतात. आमच्या सांगलीच्या दादामहाराज केळकरांनी शिवाजीमहाराजांची आरती केली आहे. शिवसमर्थ मंदिरात ती लावलेली आहे. तुम्ही सामान्यांचे, रयतेचे राजे तर होताच, पण संतांनासुद्धा तुम्ही मान्य होतात! सध्याचे नेते संतांना मान्य होतातच असे नाही कारण तिथला पॅरामिटर वेगळा आहे! अनेक राजकरणी आहेत पण ते संतांना मान्य आहेत का असे विचारले तर नाही असेच म्हणावे लागेल! मी नावं घेत नाही कारण काकामहाराजांनी सांगितले आहे की कोळसा उगाळायचा नाही! चंदन उगाळायचं !

संतांना मान्य होणारे राजे होते शिवाजीमहाराज! म्हणून रामदासांसारखा नि:स्पृह संत स्तुती करतो, 'निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।' रामदासांनी जी-जी विशेषणे वापरली आहेत ती रामदासांशी नफरत करणारी माणसेसुद्धा वापरतात! जाणता राजा! 'शिवकल्याण राजा' या नावाची लताबाईंची एक ध्वनिफित सर्वत्र लोकप्रिय झाली आहे. रणजित देसाईंची गाजलेली कादंबरी– 'श्रीमान योगी'! रामदासांनी ज्या उंचीवर जाऊन शिवाजीमहाराजांची स्तुती केली आहे, त्या उंचीवर अजून कोणी आधुनिक लेखक, कवी पोहोचलेला नाही. ते जसे सामान्यांचे होते, रयतेचा राजा, तसे संतांचेही होते श्रीमंत योगी!

आपल्याला पद्मपुराण, मत्स्यपुराण ही परमेश्वराच्या अवतारावरील पुराणे माहीत आहेत. पण एक अनुपुरण म्हणून पुराण आहे, ज्याला 'शिवभारत' म्हणून ओळखले जाते. ते कवींद्र परमानंद नेवासकर यांनी महाराज हयात असताना संस्कृत भाषेत लिहिलेले त्यांचे चरित्र आहे. त्याला अनुपुरण असे म्हणतात आणि हे अनुपुरण काशीच्या पंडितांना समजावे म्हणून संस्कृतमध्ये लिहिलेले आहे. म्हणजे, त्यांच्यावर पुराण निर्माण झालेले आहे, त्यांची संतांनी स्तुती केलेली आहे. आपण शिवजयंतीच्या मिरवणुकीत भजन म्हणत असतो, 'शिवछत्रपती राजा महाराष्ट्राचा । अवतार महादेवाचा ।।'

आता फक्त दोन-चार उदाहरणे देतो कारण वेळापत्रक पाळायला शिवाजीमहाराजांनीच शिकवलेले आहे. शिवाजीमहाराज शाइस्तेखानाची बोटे छाटली तेव्हा महाराज शत्रूच्या पाऊण लाख सेनासागरात गेलेले होते. त्या वेळी दहा नव्हे, दोन मिनिटे उशीर

झाला असता तर काय झाले असते कल्पना करा! अफझलखानाच्या भेटीत, शाइस्तेखानाच्या भेटीत डाव उलटा पडला असता तर?

'अखंड सावध असावे । दुश्चित्त कदापी नसावे ।।' असे रामदासांनी सांगितले आहे. ते सावधपण शिवाजीमहाराजांजवळ कायम होते आणि ते वेळापत्रक कायम पाळायचे.

शिवाजीमहाराजांवर परंपरा निर्माण झाल्या. दिवाळीत किल्ले करण्याची परंपरा नाही निर्माण झाली? अशा परंपरा किती जणांवर निर्माण झाल्या. रामावर परंपरा आहेत, कृष्णावर परंपरा आहेत, शिवाजीमहाराजांवर परंपरा निर्माण झाली की दिवाळीच्या वेळी, आपल्या सर्वोच्च आनंदाच्या क्षणात शिवाजीमहाराजांची स्मृती किल्ला उभारून जपायची! राजाला विष्णूचा अवतार मानतात, मग शिवाजीमहाराजांना महादेवाचा अवतार का म्हटले आहे? मला असे वाटते की समुद्रमंथनाच्या वेळी लक्ष्मी, कौस्तुभ वगैरे विष्णूने घेतले, पण हलाहल महादेवांकडे आले! चारी बाजूंना पसरलेले मुसलमानी सत्तेचे हलाहल महाराजांनी प्राशन केलं आणि ते पचवून दाखविले, म्हणून अवतार महादेवाचा!

महाराज भाषेत, म्हणींच्या रूपात रुजलेले आहेत. 'गड आला पण सिंह गेला!' कोंढाण्याचे सिंहगड हे नाव आधीपासून होते. पण तानाजी गेला, महाराजांनी ही उपमा वापरली आणि ती भाषेत रुजली आणि आपण ती वापरू लागलो. दुसरी म्हण - 'प्राणावर बेतले पण बोटावर निभावले', शाइस्तेखानावरील छाप्याच्यावेळी ही म्हण रुजली. आणखीही एक म्हण आहे- 'शिवाजी जन्माला यावा पण शेजारच्या घरात!'

म्हणींनतर वाक्प्रचार पहा- 'कात्रजचा घाट दाखवणे!' शाइस्तेखानाच्यावरील हल्ल्याच्या वेळी महाराजांनी कात्रजच्या घाटात बैलांच्या शिंगांना पलिते बांधून सोडून दिले आणि आपण सिंहगडाकडे निघून गेले! तेव्हापासून दिशाभूल केली की म्हणतात कात्रजचा घाट दाखवला. राजकारणात अनेक वेळा कात्रजचा घाट दाखवला जातो.

'अटकेपार झेंडा नेले । कृष्णाकाठचे घोडे अटकेला पाणी प्याले ।
सह्याद्रीचे रणशूर हिमगिरीस जाऊन भिडले ।'

झेंडे अटकेपार नेणे हा वाक्प्रचार झाला! संभाजीमहाराजांचा 'बलिदानदिन' पाळला जातो. शिवप्रतिष्ठानचे कार्यकर्ते पायात पादत्राणे घालत नाहीत, एक वेळ उपवास करतात, का? तर महिनाभर संभाजीराजांचे हाल करण्यात आले ते दु:ख अंत:करणात टोचत राहावे म्हणून! सांगलीहून १४ जानेवारी १९९२ पासून रोज एक किंवा दोन मुले रायगडावर पूजा करायला जातात!

चंदगडच्याही पलीकडे पारगड म्हणून एक किल्ला आहे. हे नाव महाराजांनीच दिले आहे! सुंदर केंजळगडाला महाराजांनी नाव दिले आहे, मनमोहिनी गड! महाराज अशी सुंदर नावे देत असत! तर त्या पारगडाची किल्लेदारी दक्षिण दिग्विजयाला जात असताना महाराजांनी तानाजीचे सुपुत्र रायबाना दिली. आजही तो किल्ला वावरातला नसला तरी कोणीतरी मालुसरे घराण्यातील वंशज तेथे राहतो. तुम्ही अजून येथे का राहता असे विचारले असता ते सांगतात की चंद्रसूर्य असेपर्यंत येथे रहा अशी महाराजांची आज्ञा आहे! आणि म्हणून आम्ही येथे राहतो.

शिवजयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करण्यास टिळकांनी सांगितले कारण ती राष्ट्रीय चळवळ व्हावी! ज्याप्रमाणे जागृती व्हावी म्हणून आपण दिवाळीत छोटे किल्ले करतो त्याप्रमाणे महाराजांनी हा मोठा किल्ला बांधलेला आहे. त्यातली प्रेरणा सातत्याने आपले अंत:करण प्रज्वलित करीत राहावी यासाठी आपण शिवजयंतीला सातत्याने आले पाहिजे! डेरवण गावचा जो आमूलाग्र विकास झाला आहे त्याची प्रेरणा शिवसृष्टीतून निर्माण झाली आहे! महाराजांच्या प्रेरणेतून काय घडू शकते हे आपण अनुभवतो आहोत आणि त्यासाठी पुन्हापुन्हा शिवजयंतीला येथे येणे आवश्यक आहे! भारत माता की जय!

यानंतर प्रमुख वक्त्या मा. डॉ. सुजाता शेणई यांनी दुर्गपुत्र शिवाजी या विषयावर आपले विचार व्यक्त केले. डॉ. शेणई या मराठवाडा मित्रमंडळ वाणिज्य महाविद्यालय, डेक्कन जिमखाना, पुणे येथे प्राध्यापक असून मराठी साहित्यात विशेष रुची आहे. 'सुर्वे, महानोर, ग्रेस यांची कविता' या विषयावर त्यांनी डॉक्टरेट केलेली आहे. चार आदर्श शिक्षक पुरस्कारांनी सन्मानित डॉ. शेणई यांनी 'उपयोजित मराठी' आणि 'पद्याक्षरे' ही दोन पुस्तके लिहिली आहेत.

आपल्या भाषणात त्या म्हणाल्या, ''खूप मोठ्या व्यासपीठावर बोलण्याची संधी मला मिळाली आहे, त्याबद्दल मी आधीच संयोजकांचे आभार मानते. माननीय सचिन कानिटकर सर त्यांच्या भाषणात म्हणाले, की शिवाजीमहाराज जनमानसात रुजलेले आहेत. एक पाऊल पुढे जाऊन मी असं म्हणेन, की खरं तर शिवाजीमहाराज आमच्या घराघरात राहत आहेत. प्रत्येक आई आपल्या मुलाला कधी ना कधी शिवबा म्हणते. जेव्हा ती शिवबा म्हणते, तेव्हा 'अरे! हे माझ्याच घरातलं मूल आहे की!' ही भावना निर्माण होते. जेव्हा शिवराय म्हटलं जातं त्या वेळी आपल्या कुटुंबातील एक प्रमुख व्यक्ती, तीही माझ्याच घरातील ! ज्या वेळी आम्ही शिवाजी म्हणतो तेव्हा संघर्ष उभा राहतो, आमच्या आजच्या जगण्यात संघर्ष आहेच की! ज्या वेळी आम्ही छत्रपती म्हणतो त्यावेळी राज्याचा अंमल, आमची सुरक्षा; आणि ज्या वेळी आम्ही महाराज म्हणतो त्या वेळी संतत्व आणि लोकत्व यांचे एकत्रीकरण होते. शिवबा ते शिवाजीमहाराज, कुठल्याही नावाने मनाशी विचार करा, महाराज हे आमचेच आहेत, आमच्याच घरात आहेत आणि त्यांच्यामुळेच




*डॉ. सुवर्णा पाटील – वर्षभरातील संस्थेच्या कामगिरीचा आढावा घेताना*

आमची सुरक्षितता आणि आमचं नाव आहे. त्यांनी इतिहास घडवला. रयतेच्या मनावर राज्य केलं, इतिहासाच्या कणाकणावर नाव नोंदवलं, एवढेच नाही तर सर्वोत्तम योद्धा म्हणून त्यांचंच नाव आदरानं घेतलं जातं, म्हणूनच आमच्या सर्वांसाठी ते अत्यंत आदरणीय आहेत. महाराजांवर बोलण्यासाठी अनेक विषय आहेत पण मी माझ्यासाठी जो विषय तयार केला आहे त्याचं नाव आहे दुर्गपुत्र शिवाजीमहाराज! दुर्ग या शब्दालाच आपण गड, किल्ले असे समानार्थी शब्द वापरतो.

शिवाजीमहाराज, शिवनेरी ते रायगड ! जन्म ते मृत्यू हा महाराजांचा जीवनप्रवास या दुर्गांच्या इतिहासानं आणि साक्षीनं झालेला आहे. महाराज शिवनेरीवर जन्माला आले आणि तेथेच मावळ्यांसोबत वाढत गेले. आई जिजाऊसाहेब त्यांना रामायण महाभारतातील कथा ऐकवत. त्यातील एका कथेत भगवान श्रीकृष्ण वर्णन करताना असे म्हणतात, की 'दुर्गांच्या मदतीने बायकासुद्धा लढू शकतील, तर मग आमचे महारथी लढतील यात नवल काय?' दुसऱ्या कथेत पितामह भीष्म युधिष्ठिराला सांगतात, 'राज्य निर्माण करायचे असेल, राज्य संरक्षित करायचे असेल तर दुर्ग बांधणे हे फार महत्त्वाचे आहे.' महाराजांसाठी या केवळ कथा नव्हत्या तर तो दुर्गसंस्कार होता. हा दुर्गसंस्कार मनामध्ये इतका रुजला, की त्यातून त्यांचं स्वत:चं पाच शब्दांमध्ये स्वराज्यरक्षणाचं सूत्र तयार झालं. ते सूत्र म्हणजे, 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग!' हे पाचंच शब्द. पण ते होते ते स्वसंरक्षणासाठी, स्वराज्य रक्षणासाठी होते.

महाराजांनी पहिल्यांदा तोरणा किल्ला ताब्यात घेतला त्या वेळी त्यांचे वय फक्त सोळा वर्षांचं होतं. आजच्या दहावी–बारावीतील मुलाएवढं! काळ होता सतरावं शतक. तोरणा ताब्यात घेतला १६४७ साली. तोरणा ताब्यात घेतला आणि स्वराज्याचं तोरण बांधलं असं म्हणतात ते त्याच अर्थानं! त्याच्यानंतर त्याच्याच बाजूला मुरुंबदेवाचा डोंगर होता, तो महाराजांना खुणावू लागला! त्याच्यावर महाराजांनी चिलखती गड बांधला, त्याचं नाव राजगड! एक प्रचंड वैभव म्हणून आपण आज त्याचा उल्लेख करतो. राजगड संदर्भात एक फार अविस्मरणीय आठवण आहे. १९८२ साली म्हणजे महाराजांच्या मृत्यूनंतर ३०२ वर्षांनी पोर्तुगालची राजधानी लिस्बन इथं एक आंतरराष्ट्रीय किल्ले प्रदर्शन होतं. हे जागतिक किल्ले प्रदर्शन होतं. तेथील तज्ज्ञांच्या समितीनं राजगडला प्रथम क्रमांकाचं पारितोषिक दिलं. हे महाराजांचं कोणतं स्थापत्य कौशल्य होतं, की ३०२ वर्षांपूर्वी बांधलेल्या गडाला पारितोषिक मिळावं? १७–१८ वर्षाचा मुलगा ३०२ वर्षांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपलं नाव करतोय! आमच्यासाठी किती अभिमानाची बाब आहे. या राजगडाचं वर्णन (औरंगझेबाबरोबर जो मराठ्यांवर चाल करून आला




*प्रा. सचिन कानिटकर – रंगतदार वक्तृत्व*

होता तो) साकी मुस्तैदखान याने त्याच्या 'मासिरे आलमगिरी' या पुस्तकात केलं आहे. त्यातील काही ओळी वाचून दाखवते, कारण मोंगलांच्या मनात किल्ल्यांबद्दल जो थरकाप होता, जे भय होतं ते त्यातून स्पष्ट दिसतं.

'राजगड हा अतिशय उंच, त्याची उंची पाहता, तो सर्व किल्ल्यात श्रेष्ठ, त्याचा घेर बारा कोस, मजबुतीची आणि उंचीची कल्पनाच करवत नाही. या डोंगराच्या, दऱ्याखोऱ्यातून, घनघोर अरण्यातून वाऱ्याशिवाय दुसरे काहीही फिरकू शकत नाही. येथे पावसालाच फक्त वाट मिळू शकते.'

शिवाजीमहाराजांनी या गडाभोवती तीन तट बांधले, हे तट म्हणजे तीन किल्लेच! शिवाजीमहाराजांनी भक्कम तटबंदी करून इतरांना हा किल्ला जिंकणे अशक्यच करून सोडले. ही मोंगलांची प्रतिक्रिया आहे, यावरून महाराजांची दुर्गनीती लक्षात येते.

महाराज राजगडावर २७ वर्षे राहिले. त्यानंतर त्यांनी रायगड हा पासष्ट किल्ल्यांच्या गराड्यात असलेला किल्ला बांधला. २००० फुटांवर पहिली तटबंदी, ४००० फुटांवर दुसरी तटबंदी, एकूण क्षेत्र १२०० एकर, दहा हजार लोकांना वर्षभर पुरेल यासाठी ९ पाण्याच्या टाक्या एवढं सर्व तिथं आहे. स्वराज्यासाठी आवश्यक असलेल्या दुर्गांचं महत्त्व महाराजांना मनोमन पटलं होतं. त्या दुर्गांवर आधारित महाराजांची पंचतत्त्वं किंवा पंचसूत्री होती. ती कोणती होती, ते पाहायला हवं.

जर गड आपल्या ताब्यात असेल तर गड आणि गडाचा परिसर आपला असतो, स्वसंरक्षण हे तिथेच मिळू शकते. महाराजांना माहीत होतं, की शत्रू मोठा आहे. जर आम्हाला आमची जीवितहानी टाळायची असेल तर दुर्गांशिवाय पर्याय नाही. ती पंचसूत्री कोणती तर गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे राज्याचा खजिना, गडकोट म्हणजे राज्याची लक्ष्मी, गडकोट म्हणजे सैन्याचं बळ, आणि गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षक! आणि म्हणून महाराजांनी दुर्ग बांधले.

२० नोव्हेंबर १६५९ या दिवशी एक ऐतिहासिक घटना घडली आणि ती म्हणजे अफझलखानाचा वध ! प्रतापगडावर हे सगळं घडलं. तो गड नसता तर काय ही कल्पनाच करवत नाही. महाराजांचं कर्तृत्व अफाटच आहे, पण या दुर्गांचं योगदानही तेवढंच महत्त्वाचं आणि मावळ्यांनी दिलेली साथही तेवढीच महत्त्वाची! अफझलखानाचा वध म्हणजे मोंगलाना मिळालेली सणसणीत चपराक होती! पण महाराज तेवढ्यावर थांबले नाहीत. अफझलखानाच्या वधानंतर फक्त १५ दिवसांत त्यांनी पन्हाळा जिंकला आणि आपल्याला माहीत आहे, की सिद्दी जोहर सलाबतखान हा जेव्हा स्वराज्यावरती

चालून आला तेव्हा त्याला थोपवून धरण्यात पन्हाळ्याचं योगदान मोठं होतं!

याच्यानंतर जी-जी आक्रमणे आली, त्यात फत्तेखानाची स्वारी असेल, शाइस्तेखानाचं आक्रमण असेल, किंवा शत्रूची कूटनीती असेल, त्या सर्वांना पुरून उरेल असे दुर्गशास्त्र महाराजांनी तयार केलं होतं. यासाठी महाराजांनी चार प्रकारचे दुर्ग बांधले. वनदुर्ग, भूमिदुर्ग, गिरिदुर्ग आणि जलदुर्ग! हे बांधण्यासाठी वेगवेगळी स्थापत्य कौशल्ये लागतात! पाण्यात बांधायचा आणि जमिनीवर बांधायचा किल्ला यासाठी वेगळी साहित्यसामग्री लागणार! त्यासाठी कुठले 'इंजिनीअरिंग स्कील' त्यांच्याकडे असेल याचा विचार करताना आपण थक्क होऊन जातो. त्यांच्याकडे असलेल्या स्थापत्य कौशल्यातील काही प्रातिनिधिक तत्त्वं सांगते.

पहिलं तत्त्व म्हणजे गडाशेजारी मोकळी जागा सोडायची नाही. मोकळी जागा सोडली तर शत्रूला हल्ला करणे सोपं झालं असतं. त्याच्याशेजारी दुसरा गड बांधून काढायचा. पुरंदरशेजारी वज्रगड आहे. पन्हाळगडाला लागून पांडवगड आहे. एका गडाशेजारी दुसरा गड बांधणे म्हणजे शत्रूला मोकळी जागा मिळू न देणं, त्याला अटकाव करणं. जे गड बांधायचे ते मजबूत असलेच पाहिजेत. तात्पुरतं काम कोणतंही करायचं नाही. चिलखती बुरूज बांधायचे. मजबूत, भक्कम काम करायचं. गडावरती दरवाजे असे बांधले, की खालून वरती मारा होता कामा नये आणि दरवाज्याच्या पुढे बुरूज असले पाहिजेत. दरवाज्यातून आत जाणं आणि बाहेर येणं हे नियंत्रित असलं पाहिजे. शत्रूला आपला दरवाजा नेमका कोठे आहे हे समजणार नाही आणि तो वेगळ्या बाजूने येण्याचा प्रयत्न करेल. चोर दरवाजे ठेवले कारण वेळप्रसंगी आपण सहीसलामत बाहेर पडू. महाराजांचेच वाक्य आहे, 'सहीसलामत बाहेर पडणं म्हणजे पळून जाणे नव्हे! तर परत सिद्ध होऊन पुन्हा वार करण्यासाठी काही वेळेला दोन पावलं मागे व्हावं लागतं!'

महाराजांचा दुसरा निर्णय असा, की गडावर एकच मोठी इमारत बांधायची. छोट्या इमारतींमुळे फितुरीला जास्त संधी मिळते. मजबूत विटा, चुना यांचा वापर करायचा. छोटीशीही भेग ठेवायची नाही कारण छोटासा किडाही बांधकाम पोखरू शकतो. एवढंच नाही तर राजवाड्याभोवती निरगुडीचं कुंपण घालायचं. कोणत्या झाडाचं कुंपण असावं हेही महाराज एवढा व्याप सांभाळताना सांगत होते. तिसरे धोरण म्हणजे गड बांधला जाईल तेव्हा त्यामध्ये पाण्याची व्यवस्था, राहण्याची व्यवस्था, दारूसामानाचे कोठार, अन्नधान्याचे कोठार अशा सगळ्या प्रकारची व्यवस्था ठरलेली होती.

दुर्गांचं व्यवस्थापन फार महत्त्वाचं असतं. मला सांगायला आवडेल, की गेल्या काही महिन्यांच्या अनुभवावरून आणि गेल्या दोन दिवसांच्या व्यवस्थेवरून असं वाटतंय, की महाराजांचं व्यवस्थापनाचं तत्त्व इथं जागोजागी जाणवतं आहे! थोडं विषयांतर करून सांगते, काल नऊ म्हणजे नऊला दहा मिनिटे कमी असताना ड्रायव्हर आमच्याकडे आलेला होता! कालपासून हे सारं पाहून मला फार छान वाटतयं. बोलणं सोपं असतं पण प्रत्यक्ष अंमलात आणणं फार कठीण असतं. मी काल वालावलकर सरांना म्हटलं, की आपण महान आहात, कारण लोकांकडून कामं करवून घेणं फार कठीण असतं आणि व्यवस्थापनामधे याला फार महत्त्व आहे. यासाठी या लोकांना मी शंभरापैकी एकशेतीन मार्क द्यायला तयार आहे!

महाराजांनी व्यवस्थापनाचं जे सूत्र गडासाठी अंमलात आणलं होतं त्याच्यामध्ये हवालदार होते, सरनोबत होते, सबनीस होते, कारखानीस होते! महाराजांचं सूत्र होतं, प्रत्येक हवालदाराची बदली तीन वर्षांनी करायची. सरनोबतांची चार वर्षांनी आणि सबनीस-कारखानीसांची पाच वर्षांनी करायची. का ? तर एक व्यक्ती एकाच ठिकाणी जास्त वेळ राहिली की त्याच्यामध्ये फितुरी किंवा अन्य गोष्टी होण्याचा संभव असतो. महादजी नीळकंठराव सरनाईक हे पुरंदरचे किल्लेदार होते. वयोमानाप्रमाणे मृत्यू पावल्यावर त्यांच्या चार मुलांमध्येच किल्लेदारीवरून भांडण सुरू झालं. महाराजांनी सांगून पाहिले पण ते ऐकायला तयार नाहीत. मग त्यांना काही काळासाठी कैदही करून ठेवावं लागलं, पण तत्त्व म्हणजे तत्त्व! महाराजांनी ती किल्लेदारी मुलांना न देता नेताजी पालकरांना दिली. नेताजी पालकर किल्लेदार होते. त्यानंतर ते सरनोबत झाले. पण म्हणून नेताजींच्या मुलांना किल्लेदारी दिली नाही. अंमल म्हणजे अंमल! हे व्यवस्थापन! ठरवलेली सूत्रे कोणत्याही कारणास्तव न बदलता त्याचा शिरस्ता राखणं महाराजांना चांगलं अवगत होतं.

व्यवस्थापन इतकं कठोर होतं, की कोणी कुचराई केली तर त्याला शासन मिळायचं. या कठोर व्यवस्थापनात दडलेली माणुसकीही होती आणि प्रेमही होतं. एखाद्याला कर्तव्य बजावताना मृत्यू आला तर त्याच्या मुलांची, बायकोची, कुटुंबाची सगळी व्यवस्था महाराजांकडून व्हायची. त्या काळात गडाच्या व्यवस्थापनासाठी महाराजांनी १ लाख ७५ हजार होन ठेवलेले असायचे. आपत्ती व्यवस्थापनासाठी १ लाख २५ हजार होन ठेवलेले असायचे! महाराजांची शिकवणच होती, की गुंतवणूक करायची ती किल्ल्यात आणि माणसांत! किल्ला आणि जिवाला जीव देणारी माणसं हीच त्यांची खरी संपत्ती होती.

आता किल्ले उभे राहिले. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी सरनोबत, किल्लेदार उभे राहिले. किल्ल्यात तोफखाना आणि दारूगोळा असायचा. सुरुवातीला महाराजांकडे तोफा नव्हत्या. ज्या वेळी गरज पडते त्या वेळी त्याची निर्मिती केली जाते, हे तर स्वाभाविकच आहे. मिर्झाराजे जयसिंग यांनी पुरंदर आणि वज्रगड पाडला तो तोफांच्या




*'दुर्गपुत्र शिवाजीमहाराज!' या विषयावर बोलताना प्रमुख वक्त्या डॉ. सुजाता शेणई*

साहाय्याने पाडला. महाराजांना खूप वाईट वाटले. आपल्याकडे तोफा नाहीत म्हणून आपण किल्ले वाचवू शकलो नाही ही खंत बोचत राहिला. कालांतरानं महाराजांनी तोफा ओतण्याचा कारखाना पुरंदरवर सुरू केला. तोफांची जागा निश्चित करताना त्यांनी दोन शब्द खूप सुंदर वापरलेत. तोफा कोठे बसवाव्यात? नाजूक आणि मोक्याच्या जागी! म्हणजे लांबवरून येणारा शत्रू तुम्हाला रोखून धरता येईल.

महाराजांचा कट्टर शत्रू म्हणजे औरंगझेब होय. त्याच्याबद्दल महाराजांचं एक छान वाक्य आहे, 'औरंगझेबाला ३६० वर्षे जगावं लागेल!' महाराज असं का म्हणाले असतील? महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी झाला. त्यानंतर ते म्हणाले, 'आज हजरतीस ३६० दुर्ग आपल्याकडे आहेत. एक ना एक दिवस हा आलमगीर औरंगझेब दक्षिणेत उतरेल. माझा एकएक दुर्ग मी त्याच्याविरुद्ध एकएक वर्ष लढवीन. आलमगीराला सत्ता काबीज करायला ३६० वर्षांचं आयुष्य घ्यावं लागेल!' हे शब्द किती खरे ठरले बघा! १९ ऑक्टोबर १६९९ रोजी मराठ्यांचे सगळे किल्ले घ्यायचे या ईर्षेने औरंगझेब दक्षिणेत उतरला. शक्य तर नव्हतंच आणि ते प्रत्य़क्षात झालंही नाही ! ३ मार्च १७०७ रोजी त्याचा मृत्यू झाला, पण त्याला एकही किल्ला जिंकता आला नाही!

महाराजांनी आरमार सुरू केलं. इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच या चौघांना शह देण्यासाठी आरमार सुरू केलं. मायनाक भंडारी याला आरमाराचं सरनोबत पद दिलं होतं. त्याला मुंबईजवळच्या खांदेरी बेटावर जलदुर्ग बांधायला सांगितले. इंग्रज पाहत होते, की मायनाक भंडारी हा जलदुर्ग उभा करतो आहे. ते परस्पर मायनाकला जाऊन भेटले. त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा मायनाक भंडारी म्हणाला, 'मी फक्त माझ्या राजाचं ऐकतो, बाकी कुणाचं ऐकत नाही!' महाराजांनी माणसात गुंतवणूक केली असं मी म्हटलं ते असं!

या गडांवरती जो शेतसारा गोळा व्हायचा त्याची साठवणूक केली जायची. दुष्काळ, आपत्तीच्या वेळी सगळा धान्यसाठा रयतेसाठी वापरला जायचा! मोठमोठ्या रांजणात तेल, तूप साठवलं जायचं. मावळे जखमी झाले तर जखमांवर हे रांजणातलं तूप लावलं जायचं. महाराज शिवनेरी गडावर हजार कुटुंबांना सात वर्षे पुरेल एवढा धान्यसाठा ठेवायचे! पन्हाळ्यावरती गंगा, यमुना, सरस्वती ही धान्यकोठारे होती, त्यांच्यामध्ये २५ हजार खंडी धान्यसाठा असायचा! ३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर महाराजांचं निधन झालं, तेव्हा रायगडावरती १७ हजार खंडी तांदूळ, ७० हजार खंडी तेलतूप, गोपीचंदन २०० खंडी आणि सैंधव २७० खंडी आणि गंधक २०० खंडी! हे सारं कशासाठी, तर आपल्यामागे आपल्या प्रजेचं संरक्षण कोणत्याही परिस्थितीत झालंच पाहिजे ही तीव्र इच्छा त्यामागे होती.



*अध्यक्षीय भाषण – मा. प्रसाद कुलकर्णी*

महाराजांचा सारा प्रवास हा दुर्गांच्या साक्षीने झाला. जेव्हा महाराजांनी १६४२ला सुरुवात केली तेव्हा महाराजांकडे एक पुण्याची छोटीशी जहागिरी सोडल्यास काहीच नव्हतं! आणि १६८० मध्ये ५० हजार चौरस मैल क्षेत्र, महाराष्ट्रातले ६ जिल्हे, कर्नाटकातले ४, तामिळनाडूमधले २ आणि ३०० पेक्षा अधिक किल्ले होते! या दुर्गपुत्राचं कितीही वेळा आम्ही स्मरण केलं तरी ते कमीच! आज २१व्या शतकात आपण काय करू शकतो? किल्ल्यांबद्दल अभिमान जरूर पाहिजे पण आज तरुण मुलं किल्ल्यांवर जाऊन गैरप्रकार करतात असे आम्ही ऐकतो. इतिहासाविषयी, दुर्गांविषयी अभिमान वाटणे ही निरंतर प्रक्रिया आहे. ती तशीच सुरू राहू दे! महाराजांच्या सर्व गुणविशेषांना साक्षी ठेवून आपण आपलं काम करू या. ज्या क्षेत्रात आम्ही काम करतो ते काम जरी निष्ठेने केले तरी आम्ही देशाभिमानी ठरू! धन्यवाद!''

सभेचे अध्यक्षस्थान भूषविणारे श्री. प्रसाद माधवराव कुलकर्णी हे किर्लोस्कर ब्रदर्स लि.मध्ये 'असोसिएट व्हाईस प्रेसिडेन्ट' आणि 'निर्यात विभाग प्रमुख' असून नोकरीनिमित्ताने त्यांनी विदेशात भरपूर भ्रमण केलेले आहे. उत्कृष्ट वक्तृत्वाची देणगी लाभलेल्या कुलकर्णींनी अनेक संतसत्पुरुषांवर प्रवचने, व्याख्यानमाला दिलेल्या आहेत. 'विदेशातील भारतीय संस्कृतीचे जतन' हा आवडीचा विषय. आंतरराष्ट्रीय तांत्रिक नियतकालिकांतून तांत्रिक विषयांवर निबंध प्रकाशित. इतिहासाचे व्यासंगी अभ्यासक आणि ३० पेक्षा जास्त गडकोट भ्रमण मोहिमांमधे सहभाग. आपल्या परदेश वास्तव्यात आपणाला जाणवलेले छत्रपती शिवाजीमहाराजांचे माहात्म्य त्यांनी आपल्या अत्यंत जोषपूर्ण व्याख्यानात मांडले. ते म्हणाले,

''माझ्या आधी दोन प्राध्यापकांनी भाषण केलं आहे आणि त्यानंतर माझ्यासारख्या विद्यार्थ्याने भाषण करायचे हे फार अवघड आहे! मला आठवले की आमच्या मिरजेच्या शाळेत शिक्षकदिनी आमचे शिक्षक वर्गात बसायचे आणि वर्गात जे कोणी दंगा करणारे पण जरा बऱ्यापैकी हुशार अशा विद्यार्थ्यांना सांगायचे की आज हा तास तू घ्यायचा! त्यातून दोन गोष्टी साध्य व्हायच्या. एक म्हणजे हा तास घेण्यासाठी आधी महिनाभर तयारी करावी लागायची, त्यामुळे त्या विषयाचा अभ्यास व्हायचा आणि दुसरे म्हणजे तो विद्यार्थी मग आपल्या मित्रांना सांगायचा की वर्गात दंगा करणे सोपे आहे, पण एखादा तास घेणे अवघड आहे. त्यामुळे वर्गातील दंगापण कमी व्हायचा! मी मिरजमध्ये राहतो. संत वेणाबाईंचा मठ माझ्या शेजारी आहे. रामदासांची एक शिष्या ३००-३५० वर्षांपूर्वी या दऱ्याखोऱ्यात राहत होती ही सामान्य गोष्ट नाही.

त्यामुळे बालपणापासून समर्थ रामदासांचे संस्कार माझ्यावर झाले. आणि समर्थांबरोबर घोड्यावर स्वार होऊन छत्रपती शिवाजीमहाराज येतातच! त्यामुळे महाराजांच्या चरित्राचे पारायण तर

झालेच पण तीसपेक्षा अधिक गडकोट, किल्ल्यांच्या मोहिमा झाल्या. पन्हाळगड ते विशाळगड, भुदरगड ते रांगणा, शिवाजीमहाराज ज्या वेळी ज्या पावसाळ्यात गेले ते काही प्रसंगसुद्धा अनुभवले. त्यामुळे शिवाजीमहाराजांचा भक्त, पाईक बनलो.

मला असे वाटते ज्याज्या वेळी आम्ही रामायण म्हणतो, त्यात्या वेळी रामाबरोबर रावणाचा उल्लेख करतो. ज्या वेळी आम्ही महाभारताचा उल्लेख करतो, त्या वेळी भगवान श्रीकृष्णांबरोबर कंसाचासुद्धा उल्लेख करतो. आणि ज्याज्या वेळी आम्ही शिवाजीमहाराजांचा उल्लेख करू त्या वेळी हे अफझलखान आणि शाइस्तेखान येतातच. शाइस्तेखान लाल किल्ल्याच्या पायऱ्यांवरून पाय घसरून पडला असता आणि त्याची तीन बोटे फ्रॅक्चर झाली असती तर त्याचे नाव इतिहासात आले असते? छत्रपती शिवाजीमहाराजांच्या भवानी तलवारीचा स्पर्श त्याला झाला म्हणून शाइस्तेखान अजरामर झाला. छत्रपती शिवाजीमहाराजांचे नाव घेतो तेव्हा आपणाला अफझलखान आठवतो. हा अफझलखान समजा विजापूरच्या किल्ल्यात अथवा प्रतापगडाच्या पायथ्याशी कोविड १६ ने मेला असता, आणि त्याची सगळी टीम क्वारंटाईन झाली असती तर हिंदुस्थानच्या इतिहासात त्याचा कुणी उल्लेख केला नसता! शिवाजीमहाराजांचा स्पर्श त्याला झाला म्हणून आजच्या या शिवजयंतीच्या पावन दिवशीही त्या पापी अफझलखानाचा उल्लेख आपण करतो!

आपण खंडेरायांना म्हाळसाकान्त म्हणतो कारण त्या मणीमल्ल राक्षसाने वर मागून घेतला की तुझा मला स्पर्श झाला, आता तुझ्याआधी माझे नाव येऊ दे! आपण महिषासूरमर्दिनी का म्हणतो? तसं जिथेजिथे शिवाजीमहाराजांचे नाव येते, तिथेतिथे अफझलखान, शाइस्तेखानाचे नाव येते, म्हणजे शिवाजीमहाराजांच्या जीवनचरित्रामध्ये शत्रूंनासुद्धा अजरामर करण्याची, पावन करण्याची ताकद आहे! आम्ही त्यांचे पाईक आहोत! त्यांचे जीवनचरित्र आपण थोडंसं जरी अनुभवलं तरी का नाही आपण मोठे होऊ शकणार? म्हणून मला वाटते की या शिवसमर्थगडावरून शिवाजीमहाराजांच्या जीवनचरित्रातील एक क्षण जरी आपण घेऊन गेलो तरी आपण नक्कीच मोठं कार्य करू शकू!

मी माझं व्याख्यान जे मांडणार आहे ते विश्वव्यापी श्री शिवछत्रपती! त्याचा पूर्वार्ध असा आहे की शिवाजीमहाराजांच्या कालखंडात जेजे कोणी व्यापारी आले, फिरस्ते आले, राजनैतिक अधिकारी आले, वैद्य आले, शिवाजीमहाराजांच्या समकालीन सतराव्या शतकात हिंदुस्थानात आले, आणि त्यांनी शिवाजीमहाराजांचे जीवनचरित्र जे अनुभवले, प्रत्यक्ष पाहिले आणि स्वार्थापोटी त्यांचे जे युरोपमधे भाऊबंद बसले होते त्यांना जे रोजनिशीतून कळविले की जेणेकरून ते इथे येताना सावध व्हावेत, आणि शिवाजीमहाराजांना विश्वव्यापी बनविले असे काही माझे त्या कालखंडातील मित्र आहेत! त्यांची उदाहरणे आणि अनुभव मी पूर्वार्धात सांगणार आहे!

आणि मी उत्तरार्धात सातासमुद्रापलीकडे १५पेक्षा जास्त देशात आणि ५०पेक्षा जास्त वेळा जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन आलो, तिथले काही अनुभव, तिथे आजसुद्धा, शिवाजीमहाराजांचा कोणत्या ना कोणत्या कारणासाठी गौरव केला जातो, त्यांचा उपयोग चांगल्या कारणासाठी केला जातो त्याचा उल्लेख मी पूर्वार्धात करणार आहे.

माझा पहिला मित्र आहे निकोलस मनुची, हा मुळचा इटलीचा. इसवी सनाच्या १६५३मध्ये, वयाच्या १४व्या वर्षी, म्हणजे सातवी–आठवीतलं मूल, इटलीमधल्या या मुलाची इच्छा होती की सगळं जग बघायचं! आईवडिलांची नजर चुकवून व्हेनीस शहराच्या बंदरामध्ये एक नाव लागलेली होती, त्या नावेत ते मूल लपून बसलं. ती नाव कुठे जाणार हे माहीत नाही! अंगावर फक्त कपडे आहेत. खिशामध्ये पैसे नाहीत. फक्त एकच तीव्र इच्छा, मला जग बघायचंय! नाव निघाली. आधी कुणी लक्ष दिले नाही आणि भूमध्यसमुद्रात नाव वादळाच्या तडाख्यात सापडली तेव्हा लक्षात आले की या मुलाला कोणी आई, बाप नाहीत! सुदैवाने त्यामध्ये इंग्लंडचा एक बडतर्फ अधिकारी होता, त्यालाही युरोपमधून बाहेर पडायचे होते! तो म्हणाला मी याचा पालक बनतो. मी याला हिंदुस्थानात घेऊन जातो. त्याचा उद्देश होता की आपल्याला बॅगा वगैरे सांभाळायला याचा उपयोग होईल! तीन वर्षांनंतर, १६५६मध्ये, सुरतेच्या तटावरती यांचे जहाज लागले. त्या अधिकाऱ्याने सांगितले की मी इंग्लंडचा राजदूत आहे. मला राजाला भेटायचे आहे! सुरतेच्या अधिकाऱ्याने त्याला शहाजहानला भेटायला दिल्लीला पाठविले. मजल दरमजल करीत ते दोघे दिल्लीच्या सीमेवर पोहोचले आणि दुर्दैवाने हा अधिकारी मेला आणि मनुची एकाकी पडला. त्याला दिल्लीत कोणी दाद देत नव्हतं म्हणून हा थेट शहाजहानच्या दरबारात गेला.

शहाजहान असा बसलेला आहे! शेजारी औरंगझेबाचा मोठा भाऊ दारा शुकोह बसला आहे. आणि हे मूल तक्रार करत आहे. सहा, सव्वासहा फूट उंच तो निकोलस तक्रार करतोय की मी असा इटलीतून आलो आहे, आणि तुमच्या लोकांनी माझ्या वस्तू काढून घेतल्या आहेत! त्याची ती तडफ पाहून दारा खूष होतो आणि त्याला आपल्या नोकरीत ठेवतो. पुढे दाराचे आणि औरंगझेबाचे युद्ध होते. तो दाराच्या बाजूने लढतो. दाराचा मृत्यू होतो आणि तो इच्छा नसताना औरंगझेबाकडे येतो आणि पुढे मिर्झाराजे जयसिंह यांचा विश्वासू बनतो. आणि त्यांच्याच बरोबर हा महाराष्ट्रात येतो. येताना नाशिक परिसरात जयसिंहानी त्याला काही जबाबदारी दिलेली आहे. राजकरण कसं चालतं पाहा!

हा निकोलस औरंगझेबाच्या राज्यारोहणाच्या वेळी हिंदुस्थानात आला आणि औरंगझेबाच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी परत गेला. पन्नास



*श्रीसहजानंदसरस्वती महाराज आणि भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहताना डॉ. सुजाता शेणई*

वर्षांच्या या कारकिर्दीत त्यांने शहाजहानला बघितलं, दारा शुकोहला बघितलं औरंगझेबाला बघितलं आणि मुअज्जमला बघितलं, म्हणजे मोगल सल्तनतीच्या तीन पिढ्या त्याने बघितल्या!

त्याने शिवाजीमहाराजांना पाहिले, त्यांच्याबरोबर सोंगट्या खेळला, त्यांच्याबरोबर अन्न प्राशन केलं, शिवाजीमहाराजांबरोबर त्याने व्यवहार केले. त्यानंतर संभाजीमहाराजांकडे तो पोर्तुगीजांचा प्रतिनिधी म्हणून गेला. त्यानं शाहुमहाराजांना पण पाहिलं म्हणजे छत्रपतींच्या पण तीन पिढ्या त्याने पाहिल्या आहेत. म्हणून त्याची विश्वासार्हता आहे.

तो सांगतो, मिर्झाराजांशी आमची अशी चर्चा झाली की शिवाजीमहाराजांना नामोहरम करायचं असेल तर त्यांच्या मंत्र्यांना मोठमोठ्या रकमांची लाच देऊ या, जेणेकरून ते शिवाजीमहाराजांवर दबाव निर्माण करतील की सध्याची परिस्थिती अशी आहे की आपण औरंगझेबाबरोबर समझोता करू या! निकोलस लिहितो की आम्ही वाट पाहत होतो की असं काहीतरी उत्तर येईल. पण मला आश्चर्य वाटले, हिंदुस्थानात पहिल्यांदाच असे घडले, की शिवाजीच्या एकाही मंत्र्याने लाच स्वीकारायचे लांबच, त्यांनी आमच्या गेलेल्या माणसाला हाकलून तर दिलंच, आणि मी पहिल्यांदाच हिंदुस्थानात असे पाहिले की शिवाजीमहाराज आणि त्याचे मंत्रिमंडळ यात एकवाक्यता होती, विश्वासार्हता होती.

चार खंडात २००० पानांचा ग्रंथ त्याने लिहिलाय! ते वाचल्यावर आपल्याला शत्रूकडच्या गोष्टी कळायला लागतात. हा भाग्यवान आहे. पुरंदरचा लढा चालू होता तेव्हा हा मिर्झाराजांबरोबर तोफखान्यावर होता. तो लिहितो की एका सकाळी मी तेथे काहीतरी काम करीत असताना काही मराठा सरदार घोड्यावरून तेथे आले. एक राजबिंडा मराठा तरुण सरळ मिर्झाराजांच्या राहुटीच्या दाराजवळ गेला आणि द्वारपालाला सांगितले की मी शिवाजी आलोय असे आत सांग! शिवाजी हे नाव ऐकताच त्या पहारेकऱ्याने आपली शस्त्रे टाकली, तीन कोलांट्या खात तो राहुटीमागे लपून बसला! महाराज हसतहसत मागे गेले. त्याच्या खांद्यावर थाप मारून ते म्हणाले, 'अरे! मी इथे कोणाला मारायला आलो नाही, मला मिर्झाराजांना भेटायचे आहे!'

शिवाजीमहाराजांचा दरारा तो युरोपमधल्या आपल्या लोकांना सांगतोय की बाबांनो, इथे येताना जरा जपून या! शिवाजीमहाराजांची ख्याती, तिने शिवाजीमहाराजांना विश्वव्यापी केलं!

मनुची आणखी एक गोष्ट सांगतो. 'पुरंदर तहाच्या वेळीच आम्ही असे रात्री भोजनोत्तर मिर्झाराजांच्या राहुटीत बसलो होतो. मी, मिर्झाराजे आणि त्यांचा एक ब्राह्मण कारभारी गंजिफाचा डाव मांडला होता. आणि अचानक शिवाजीमहाराज राहुटीत आले! तत्पूर्वी माझी त्यांची भेट झालेली नव्हती. माझ्याकडे बोट दाखवून त्यांनी विचारले की हे कोणत्या देशाचे राजे आहेत? मिर्झाराजांनी ओळख करून दिली की हे फिरंगी असून इटलीचे आहेत. पुढे अर्धा तास आम्ही गप्पा मारत होतो. परंतु आपण शत्रूच्या छावणीत आहोत याविषयी यत्किंचित भीती महाराजांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती!

ते माझ्या शेजारी बसले आणि मला विचारू लागले की तुमच्या युरोपमध्ये लढाया कशा होतात? तेथे कोणती शस्त्रास्त्रे वापरतात? ती येथे आयात करता येतील का? त्यांची निर्मिती येथे करता येईल का? तो लिहितो की हा माणूस वेगळा आहे, माणसाची पारख करण्याची ताकत, क्षमता याच्यामध्ये आहे! शिवशाहीमध्ये माणसाची पारख करण्याची किती आवश्यकता होती!

आपल्या संस्कृतीत चार युगं मानतात. पहिले सत्ययुग. त्यात सूरलोक म्हणजे तेथे देव राहणार आणि असूरलोक होते तेथे राक्षस राहणार. म्हणजे सज्जन आणि दुर्जन यांच्यात विश्वाचे अंतर होते! नंतर त्रेतायुगाचा कालखंड आला. या रामायणाच्या कालखंडात काय झाले? राक्षस लंकेत होते, राम हिंदुस्थानात होते. म्हणजे ते अंतर दोन देशांएवढे झाले! नंतर द्वापारयुगात, महाभारतात, राक्षस आणि देव, दुर्योधन आणि युधिष्ठीर एका कुटुंबात जन्माला आले. कलियुगात राक्षस आणि देव एकाच व्यक्तीत वागवताहेत! म्हणून ती व्यक्ती कधी देव बनेल आणि कधी राक्षस बनेल हे सांगता येत नाही. म्हणून माणसाची पारख असणे अत्यंत महत्त्वाचे होते! ती पारख शिवाजी महाराजांजवळ होती! हे बाबासाहेब पुरंदरे यांनी नव्हे, तर मनुचीने आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे!

त्याने पुढे लिहिले आहे की की मी आग्र्याच्या गल्लीबोळातून फिरायचो त्या वेळी लोकांची अशी चर्चा मला ऐकू यायची की अल्ला शिवाजीवरती प्रसन्न आहे! का तर औरंगझेबाने बापाला कैदेत टाकले आणि भावाला ठार मारले! त्यामुळे शिवाजीमहाराजांबरोबर युद्ध करताना निम्मे सैन्य मानसिकदृष्ट्या आधीच खचलेले असायचे कारण अल्ला 'त्याच्या'वर फिदा आहे!

काय सामर्थ्य होतं की शत्रूच्या मोहल्ल्यामधे स्वत:बद्दल एवढी जरब निर्माण करणं की अर्ध युद्ध शत्रू येतानाच हरलेला असतो आणि पुढचं युद्ध फार सोपं होतं. कारण मावळ्यांमध्ये अशी भावना दृढ होती की महाराजांना आई भवानी प्रसन्न आहे! महाराजांवर खरंच दैवी कृपा होती म्हणून हे हिंदवी स्वराज्य झाले!

आपल्या चार खंडांच्या शेवटी तो असं लिहितो की मी हे मोगल साम्राज्य अनुभवले आहे आणि माझी अशी खात्री झाली आहे की एखादा चांगला सेनापती आणि वीस हजार युरोपिअन सैन्याप्रमाणे शिस्तबद्ध सैनिक हे साम्राज्य उध्वस्त करणासाठी पुरेसे आहेत! महाराजांनी काय केलं? एक चांगला सेनापती आणि तोडक्यामोडक्या संख्येतले मावळे यांनी हे मोगल साम्राज्य उध्वस्त करून टाकले!

आज कोकणात आहे म्हणून थोडं विषयांतर करून 'कायस्थ' या विषयात त्याचे निरीक्षण सांगतो. तो म्हणतो, 'यांची तलवारपण धारदार आणि लेखणीपण धारदार! मी औरंगझेबाकडे असा एक कायस्थ पाहिला की ज्याच्याकडे पगार नोंदणीचे काम होते! अत्यंत हुशार माणूस! पगार कधीच वेळेवर होत नसत! एक सैनिक पगार मागायला आला. आधीच तो वैतागलेला. त्यातच या कायस्थाचे दुसऱ्या कामात असल्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष झाले. त्यावर तो सैनिक संतापून म्हणाला की पुढच्या क्षणी पगार दिला नाहीस तर तुझे दात पाडून टाकीन! तो कायस्थ फक्त हसला. त्याने त्याचा पगार दिला आणि जाताना त्याला सांगितले की लक्षात ठेव, तुझ्या तलवारीपेक्षा माझ्या लेखणीचे सामर्थ्य मोठे आहे!

सहा महिन्यानंतर पुन्हा पगाराची वेळ आली. त्या वेळी पगार ज्या वहीत नोंदला जायचा तेथे नावासमोर त्या सैनिकाची ओळखण्याची एखादी शारीरिक खूण नोंदवलेली असायची. येथे त्या कायस्थाने लिहून ठेवले की अमुकअमुक सैनिक, पुढचे दोन दात पडलेले आहेत. पुढच्या वेळी पगार देणाऱ्या माणसाने त्याला खूण जमेना म्हणून पगार देण्यास नकार दिला. इथे नोंद आहे की तुझे पुढचे दोन दात पडलेले आहेत. तुझे तर दात चांगले आहेत! तुला पगार मिळणार नाही!' निकोलस लिहितो, 'त्या सैनिकाला स्वहस्ते आपले दोन दात पाडून घ्यावे लागले कारण त्याशिवाय त्याला पगारही मिळाला नसता आणि नोकरीही मिळाली नसती.'

माझा दुसरा मित्र आहे ॲबे कॅरे, हा फ्रेंच आहे. हा इ.स. १६६८मध्ये हिंदुस्थानात आला तो १६७६पर्यंत येथे होता. तो सुरतेला आला तेव्हा सुरतेची पहिली लूट होऊन गेलेली होती. आपला असा समज असतो की शिवाजीमहाराजांनी सुरत लुटताना या परदेशी वखारींना हात लावला नाही. हिंदुस्थानी इतिहासकार म्हणतात की शिवाजीमहाराजांना मोहीम २-३ दिवसात आटपायची होती म्हणून त्यांनी या वखारींमध्ये वेळ घालवला नाही. मुस्लिम इतिहासकार सांगतात की वखारीवाल्यांकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे होती म्हणून महाराजांनी त्यांचा नाद सोडून दिला!

हा ॲबे कॅरे लिहितो की १६६८ला आलो आणि १६७१ला पुन्हा एकदा सुरत लुटली गेली. मी ठामपणे आणि खात्रीपूर्वक सांगतो की या वखारीत माझी रोज उठबस असायची! मी या वखारवाल्यांशी बोलून सांगतो, महाराजांनी या वखारींना हात न लावण्याचे कारण महाराज धूर्त होते. दूरदृष्टी होते, धोरणी होते. जेव्हा कधी आपलं स्वराज्य होईल, तेव्हा हे व्यापारी आपल्याकडे येतील, त्यांची आधुनिक व्यापार पद्धती आपल्याला आत्मसात करायची आहे. या दूरदृष्टीतून त्यांनी या वखारींना हात लावला नाही असे हा कॅरे लिहितो.

पुढे तो इथल्या व्यवस्थेचं वर्णन करतो. ''मी पहिल्यांदा, सुरतेहून, कोकणातून सेंट थॉमस, म्हणजे मद्रासकडे निघालो होतो. वाटेत दाभोळजवळ कोणत्यातरी बंदराजवळ आमच्या नावेला छोट्याछोट्या नावांचा गराडा पडला! भगवी निशाणे होती. (या डायरीतील नोंदी आहेत. या इतिहासात मिळणार नाहीत, पण त्याच्या




*श्री. विजय यशवंत पागडे यांचा मा. अध्यक्षांच्या हस्ते सत्कार*

पुस्तकात या नोंदी आहेत.) आम्ही सजग झालो. आम्हाला वाटले हे कोणीतरी समुद्री चाचे आहेत! आम्हाला लुटण्यासाठी हे आले आहेत! त्यातले जे प्रमुख शस्त्रधारी होते त्यांनी आमच्या नावेत प्रवेश केला. ते म्हणाले, घाबरू नका. आम्हाला नावेची तपासणी करायची आहे. शस्त्रास्त्र, दारूगोळा आहे का पाहायचे आहे. त्यांनी तासभर पाहणी केली. तासभर ते आमच्याशी बोलत राहिले. त्यांनी आम्हाला धन्यवाद दिले आणि आल्यामार्गी निघून गेले. हा माझ्यासाठी सुखद धक्का होता! जाताना ते सांगून गेले की या समुद्रावर शिवाजीमहाराजांचे राज्य आहे, म्हणून आम्ही तपासणी केली. त्यांची ही व्यवस्था पाहिल्यावर मला युरोपिअन व्यवस्थेची आठवण झाली.''

तिसरा सुंदर अनुभव त्याने सांगितला आहे. तो म्हणतो १६७२मध्ये आम्ही चौल-रेवदंडा येथे होतो. आम्हाला राजापूरच्या फ्रेंच वखारीत जायचे होते म्हणून आम्ही शिवाजीमहाराजांच्या अधिकाऱ्याकडे परवानापत्र मागायला गेलो, कारण तो त्यांचा प्रदेश होता. एक देखणा राजबिंडा अधिकारी तेथे बसलेला होता. आम्हाला त्याच्याकडे नेण्यात आले. आम्ही आमचे काम सांगताच तो म्हणाला, ''तुम्ही आम्हाला संधी दिल्याबद्दल आम्ही आभारी आहोत. थोडा वेळ थांबा. आमचे अधिकारी तुम्हाला परवाना देतील.'' तोपर्यंत तो अधिकारी माझ्याशी आणि माझ्यासोबतच्या लोकांशी बोलत राहिला. त्याने फ्रान्सबद्दल, फ्रेन्च राजाबद्दल चौकशी केली. आम्ही त्याला विचारले की तुम्ही आमच्या राजाची चौकशी केली, तुमच्या राजाबद्दल काही सांगा ना! त्या वेळी तो एवढा बोलला! तो म्हणाला, ''आमच्या राजाची इच्छा आहे की आमच्या राज्याच्या सीमा सिंधू नदीपासून बंगालच्या उपसागरापर्यंत वाढवायच्या आहेत!'' पहा! राजाचे विचार खाली सेवकापर्यंत कसे पोहोचले आहेत!

येथे त्याने एक वाक्य लिहिले आहे ते जाताजाता सांगतो. तो शिवाजीबाबत लिहितो, No merit was left unrewarded, no offence went unpunished! गुणाची कदर आणि गुन्हेगारांना शिक्षा हे शिवाजीमहाराजांचे ब्रीद होते असे तो युरोपिअन आपल्या बांधवांसाठी लिहून ठेवतो!

इराणचा बादशहा शाह अब्बास याच्या पूर्वजांनी मोगलांना दिल्लीच्या तख्तावर बसवायला मदत केली. शहाजहानच्या काळात यांचे संबंध बिघडले आणि मग अफगाणिस्थानात थोडी भांडणे व्हायला लागली. त्या वेळी इराणच्या बादशहाचा एक वकील दिल्लीला आला आणि आपल्या वकिलाचे चांगले स्वागत झाले पाहिजे अशी त्याची अपेक्षा होती. दिल्ली आग्र मार्गावर लोकांनी दुतर्फा उभे राहून त्याचे स्वागत केले. हा वकील दरबारात गेला पण रिवाजाप्रमाणे त्याने बादशहाला मुजरा केला नाही. त्याने फक्त छातीवर हात ठेऊन थोडे झुकून नमस्कार केला, औरंगझेबाला संताप आला. आपल्या सैनिकांना सांगून त्यांच्याकरवी बळाने त्याला कुर्निसात करायला लावला. चिडलेल्या वकिलाने ही हकिगत परत गेल्यावर आपल्या बादशहाला सांगितली. पुढे मोंगलांचा वकील दोन वर्षांनी इराणच्या दरबारात गेला. सोबत चौदा शृंगारलेले घोडे, रत्नजडीत कट्यार

वगैरे भेटवस्तू घेऊन गेला. इराणच्या राजाला बदला घ्यायचा होताच! त्याने त्या वकिलाकडे लक्षच दिले नाही. त्याला आपल्या घोड्यामागून चालत यायला लावले. दरबारात आल्यावर वकिलाने इराणच्या बादशहाला एक चित्र भेट दिले. त्यात असे दाखविलेले होते की अल्लाने प्रसन्न होऊन आपला दूत म्हणून औरंगझेबाची नेमणूक केली आहे. खाली लिहिले होते 'जगज्जेता औरंगझेब' आणि पुढे लिहिले होते, 'जोपर्यंत चंद्रसूर्य आहेत तोपर्यंत तुम्हाला लोकांचा जयघोष ऐकायला मिळेल, औरंगझेब! औरंगझेब!!' चित्र पाहून संतापलेल्या शहा अब्बासने ते चित्र फाडून टाकले आणि वकिलाला विचारले, जो बापाला तुरुंगात टाकतो, सख्ख्या भावाला मारतो तो देवदूत असू शकतो का?

मग त्या वकिलाला पुढे वाचायला सांगितले. त्याला मजकूर दिसावा यासाठी, दोन मशालधारी त्याच्या बाजूला उभे केले आणि त्यांनी मशालीचा प्रकाश पत्रावर पाडीत असल्यासारखे करून वकिलाच्या दाढीलाच आग लावली. तशाही अवस्थेत बादशहा वकिलाला वाचण्याचा आग्रह करीत होता. जगज्जेता हा शब्द ऐकून तो म्हणाला, 'ज्याला शिवाजीला जिंकता आले नाही तो जगज्जेता कसा?'

एका अनामिक कवीने लिहिले आहे, ''सरित्पतीचे जल मोजवेना। माध्यान्हीचा भास्कर साहवेना । मुठीत वैश्वानर साहवेना। तैसा शिवाजी नृप जिंकवेना ।।''

आता मी माझे सातासमुद्रापलीकडचे अनुभव सांगणार आहे. पहिला अनुभव इंग्लंडमधला. तेथे काही वर्षे वास्तव्य होते. तेव्हाचा आमचा उपक्रम असा होता की समोर शिवाजीमहाराजांची प्रतिमा ठेवायची आणि मित्रांसमवेत बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेले शिवचरित्र वाचायचे. ५० मिनिटे चरित्र वाचायचे, नंतर ध्येयमंत्र, त्यानंतर प्रेरणामंत्र, मग पारायण संपले! मग आम्हाला स्फूर्ती आली की 'रॉयल आर्मारियस म्युझिअम' बघायला जाऊ या! पूर्वी ते लंडनमध्ये होते, आता लीड्समध्ये आहे. एक चार मजली इमारत आहे. त्याच्यामध्ये शस्त्रास्त्रे आहेत. आणि ब्रिटिशांना जे माफिनामे, जयपत्रे, शस्त्रास्त्रे आदी मिळाली ती तेथे ठेवलेली आहेत. शिवाजीमहाराजांचे सिंहासन दिसते का हे आम्हाला पाहायचे होते! पहिल्या मजल्यावर आफ्रिकन राजांसंबंधी वस्तू, शस्त्रास्त्रे, माफिनामे वगैरे होते. आणि या सगळ्यांमागे शरणागती होती. दुसऱ्या मजल्यावर आग्नेय आशियातील माण्डलिक राजांसंबंधी वस्तू, त्यांनी दिलेली माफिपत्रे, शस्त्रास्त्रे वगैरे होती. तिसऱ्या मजल्यावर मध्यपूर्वेतील राजांनी दिलेली शरणागतीची कागदपत्रे, वस्तू वगैरे होते. आम्ही म्हटले हे काय आम्ही बघायला आलो? चौथ्या मजल्यावर गेलो. पहिल्या दालनात, हे कोण जोधपूरचे राजे, त्यानी दिलेली तलवार; ही बंगालच्या संस्थानिकांची शरणागती दाखविणारी कागदपत्रे, वस्तू! हे सगळं बघताना मन विदीर्ण होत होतं! हे सगळं बघत, मध्यभागी एक साधारण वीस बाय बावीसचा एक प्रशस्त हॉल होता तेथे आलो. त्याला तीन प्रवेशद्वारे होती. आम्ही प्रवेश केला आणि समोरच्या भिंतीवर एक दहा फूट बाय दहा फूट असा एक भगव्या रंगाने काढलेला स्वराज्याचा नकाशा लावलेला होता आणि खाली लिहिलेले होते, This is the Maratha Empire, British never conquered! आज सुद्धा आठवणीने अंगावर काटा येतो! त्याच्याखाली एका सुवर्ण तबकामध्ये, दोन वाघनखे ठेवलेली होती. आणि त्यावर लिहिलेले होते, 'या वाघनखानी शिवाजीमहाराजांनी अफझलखानाचा वध केला!' ('या' की 'अशा' असे लिहिलेले होते हे मला नक्की सांगता येणार नाही.) डाव्या बाजूच्या भिंतीवर काही वर्तमानपत्रात आलेल्या मजकुराची कात्रणे लावलेली होती. त्यात इ.स. १६६०च्या मध्यात आलेली बातमी लावलेली होती, ''Shivaji killed Afazalkhan!'' बातमीत लिहिले आहे की आमच्या सुरतेच्या वखारीतील माणूस कळवितो की शिवाजीचे प्राबल्य या भागात वाढलेले आहे आणि त्याने विजापूरच्या एका बलाढ्य सरदाराला नुकतेच पुण्याजवळच्या जंगलामधे ठार मारले!

त्याहूनही एक महत्त्वाचे मला सांगायचे आहे. उजव्या बाजूच्या भिंतीवर अनेक लेख होते, त्यातील एक लेख एका पोर्तुगिजाने लिहिलेला होता. त्यात त्याने पुण्यापासून खंबाटकीच्या घाटापर्यंतच्या प्रदेशाविषयी वर्णन लिहिले आहे. हे १६९५ म्हणजे सभासद बखर लिहिली जाण्याआधीचे वर्णन आहे. तो लिहितो, 'या भागामध्ये एक फार मोठी संस्था आहे आणि त्या संस्थेचा अधिकारी एक फार मोठा ब्राह्मण आहे. इकडे त्याच्या शब्दाला फार मोठी किंमत आहे. या भागातून जाताना शिवाजीमहाराजांचा कोणताही सैनिक त्यांच्या मठात आश्रय घेतल्याशिवाय किंवा अन्न ग्रहण केल्याशिवाय जात नाही. त्याच्या महंतांना किंवा शिष्यांना सख्त सूचना आहेत की शिवाजीमहाराजांच्या सैनिकांना जाताना जेवूखाऊ घातले पाहिजे.' असे त्या पोर्तुगिजाने १६६०-७०मध्ये लिहिले आहे. तो पुढे लिहितो, आज संपूर्ण देशाचा दवाखाना म्हणून या आश्रमांकडे बघितले जाते. संपूर्ण देशात त्यांची चर्चा आहे. हा गृहस्थ फार मोठा अधिकारी आहे. एकदा या रस्त्याने जाताना शिवाजीमहाराज आपल्या व्यापामुळे मठात आले नाहीत म्हणून या महंताने आपल्या जवळचा शिधा आपल्या शिष्याबरोबर महाराजांना पाठवून दिला. महाराजांनी आणि मावळ्यांनी तो ग्रहण केला. महंतांनी निरोप दिला होता की राजा असो वा रंक, आमच्या सेवेशिवाय इथून पुढे जाणार नाही. आम्ही कोण देणारे! आमच्याजवळ ही संपत्ती आहे ती या समाजासाठी आहे. आमचा रामराया देणारा आहे. ही संपत्ती समाजासाठी आहे! (हे रामराया वगैरे त्या पोर्तुगिजाने लिहिलेले आहे!) त्याने लिहिले आहे, या महंताना वाचासिद्धी आहे. मोठे अधिकार परमेश्वराकडून यांना प्राप्त झालेले आहेत. हे या संपूर्ण




*श्री. देवेंद्र राजेशिर्के यांचा मा. अध्यक्षांच्या हस्ते सत्कार*

भागात मान्यताप्राप्त आहेत आणि त्यांचे नाव रामजी आहे!' हे रामजी म्हणजे दुसरे कोणी नाही तर समर्थ रामदासच होय!

समर्थ रामदास आणि शिवाजीमहाराज यांच्या संबंधाविषयी या देशात जर कोणी दुर्दैवाने विपरित बोलत असेल तर इ.स. १६९५च्या कालखंडात या पोर्तुगिजाने हे लिहून ठेवले आहे. या दोघात किती मधुर संबंध होते, ते किती गुरुशिष्यासारखे वागत होते हे लिहून ठेवलेले आहे.

अलीकडच्या काळात एका साध्वीने लिहिले आहे, ''जब इस देश मे राम और लक्ष्मण ने जनम् लिया, तो उनके पिछे विश्वामित्र का आशीर्वाद था । जब इस राष्ट्र मे चंद्रगुप्त पैदा हुवे, तब उसके पिछे संत चाणक्य की भूमिका थी । जब इस राष्ट्र मे छत्रपती शिवाजीमहाराज ने जनम लिया, तब उसके पिछे गुरू समर्थ रामदास का आशीर्वाद था । जागो! आज ये साधू संन्यासी हमारे बीच विश्वामित्र बनकर आये है । (या शिवसमर्थगडाकडे बघून मलाही असेच वाटतयं!) हमे अपना परिचय राम और लक्ष्मण बनके देना होगा । आज ये साधू संन्यासी हमारे बीच संत चाणक्य बनकर आये है । हमे अपना परिचय चंद्रगुप्त मौर्य बनके देना होगा । आज ये साधू संन्यासी हमारे बीच गुरु समर्थ रामदास बनकर आये है । हमे अपना परिचय सीवाजी की स्वाभिमानी तलवार बनके देना होगा । जागो, सिवा की तलवार बनके जागो । महाराणा प्रताप का भाला बनके जागो । और विश्व को दिखाओ की मा भारती के उपर कोई हाथ उठाएगा ये हम हरगीज नही होने देंगे ।''

या दोघातले आध्यात्मिक नाते कसे होते हे साध्वीने पुढे सांगितले आहे. या संतांनी काय सांगितलं आहे? ''ये बताओ, के कौन है यहाँ जिनको प्राणों से प्यार नही है ! मगर जगत मे जुडा शुरु से मित्र कहा, संघार नही है । ये मृत्यू क्या है, वस्त्र बदलना । कुल पलका विश्राम है साथियों । जीवन एक अखंड पर्व है, साधारण त्योहार नही है । जीना क्या है, बडी कला है । मगर एक अटल सत्य है, मरनेसे डरनेवालो को जीने का अधिकार नही है ।''

दुसरा एक प्रसंग सांगतो. माझ्या नेदरलॅन्ड्समधील कामासाठी जाताना मी अबुधाबीला चार तास थांबलो होतो. विमानतळावर पेपर्स चाळीत होतो. तेव्हा एक प्रासंगिक वृत्त वाचले. तुर्कस्थानमधील एका अधिकाऱ्याने आपल्या महिला कर्मचाऱ्याला जादा वेळ कार्यालयात थांबवून ठेवले होते. चिडून तिने त्याच्याविरुद्ध दावा दाखल केला होता. कोर्टाने असा निकाल दिला होता, की त्या अधिकाऱ्याने त्या महिलेला आपल्या गाडीने सारथ्य करीत सायंकाळी घरी नेऊन सोडावे. मुस्लिम देशात अशी शिक्षा म्हणजे मानहानीच आहे. त्या लेखात शेवटच्या दोन ओळीत लेखकाने असे लिहिले होते की तीनशे वर्षांपूर्वी, हिंदुस्थानात शिवाजी नावाच्या राजाने अशीच शिक्षा आपल्या मंत्र्याला दिली होती.

हा कोणता प्रसंग तो मला माहीत नव्हता. पण सुनीलजी चिंचोळकरांनी त्याविषयी मला सांगितले. दक्षिण दिग्विजयानंतर शिवाजीमहाराज परत येत होते. बेळगावजवळ बेलवडी नावाचा भुईकोट किल्ला आहे. सावित्रीबाई देसाई ही मराठा स्त्री गडकरी

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१

ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

होती पण किल्ला आदिलशहाकडे होता. येताना शिवाजीमहाराज मागे होते, हिरोजी फर्जंद पुढे व्यवस्था लावण्यासाठी आलेले होते. त्यांना वाटले, महाराजांसमोर काहीतरी करून दाखवावे. म्हणून त्यांनी किल्ला घेण्याचे ठरवले. पण किल्ला काही पडेना. यांना तर घाई लागली होती की महाराज येण्याआधी किल्ला घ्यायचा. म्हणून मोंगलांची मदत घेऊन त्यांनी किल्ला घेतला. महाराज आल्यावर त्यांच्यासमोर सावित्रीबाई देसाईंना उभे केले. त्या बाई आणि सोबतचे ३-४ वर्षांचे त्यांचे लेकरू पाहून महाराज संतापले आणि त्यांनी हिरोजींना फर्मावले की तुम्ही त्यांच्या पालखीचे भोई व्हा आणि त्यांना गडापर्यंत सुखरूप पोहोचवा. हिरोजींनी त्याप्रमाणे त्यांना पोहोचवले. महाराजांनी सावित्रीबाईंना १५ दिवसांचा शेतसारा साडीचोळी म्हणून दिला. बेळगावजवळ यादवाड गावात आठ शिल्पे काढलेली आहेत. त्यात एक शिल्प आहे, महाराज बसलेले आहेत. मांडीवर तो लहान मुलगा आहे. महाराजांच्या हातात दुधाचा पेला आहे, शेजारी सावित्रीबाई ताठ मानेने उभी आहे. खाली एक रिकामी पालखी आहे आणि शेजारी हिरोजी उभा आहे.

१९९५ साली मी प्रथमच परदेशात म्हणजे जर्मनीत गेलो होतो. मुम्बई - फ्रॅन्कफुर्ट विमान प्रवास केल्यावर तेथून हायडेलबर्ग रेल्वेने एक तासाचा प्रवास. आपल्याकडे गर्दीची सवय. तेथे डब्यात तुरळक माणसे होती. काही जर्मन जोडपी. आणि एक आशियाई वाटणारा माणूस होता. तो माझ्याकडे काही वेळा नजर टाकीत होता. काही वेळाने त्याने स्मितहास्य केले. मीही त्याच्याकडे बघून हसलो. त्याला माझ्याशी बोलायचे होते हे माझ्या लक्षात आले. काही वेळाने तो वॉशरूमला गेला आणि येताना माझ्याजवळच शेजारच्या लाईनमध्ये बसला. त्याने विचारले, तुम्ही भारतीय आहात का? मी होय म्हणताच त्याने गावाचे नाव विचारले. त्याला मिरज-सांगली काय माहीत असणार म्हणून मी आपले 'दिल्ली' असे सांगितले. दिल्लीतला कोणता भाग असे विचारल्यावर मी 'दिल्ली' नव्हे तर मुंबई असे म्हटले. त्यावर मुंबईत नेमके कुठे असे तो विचारू लागला. तेव्हा मी मग माझे गाव पुणे असे सांगितले, त्या क्षणी तो माझ्या शेजारीच येऊन बसला. नक्की पुणे? त्याने पुन्हा एकदा विचारले. मी हो म्हणताच त्याने मला कडकडून मिठी मारली आणि तो म्हणाला, ''म्हणजे, तुम्ही शिवाजीमहाराजांच्या राज्यातले आहात!'' माझ्या देशापासून १०,००० मैलांवर एक माणूस मी शिवाजीच्या राज्यातील आहे म्हणून मला मिठी मारतो आहे याचा अर्थच मला समजेना! मी विचारले, आपणाला शिवाजी माहीत आहेत? तो म्हणाला मी इतिहासाचा प्राध्यापक आहे. मी व्हिएटनामचा. ज्या वेळी ७०च्या दशकात अमेरिकेने आमच्यावर आक्रमण केलं तेव्हा आमच्या सरकारने जगातील नामवंत योद्ध्यांच्या युद्धनीतीचा अभ्यास करण्यासाठी काही गट स्थापन केले. माझ्याकडे शिवाजीमहाराजांच्या युद्धनीतीचा आणि गनिमी काव्याचा अभ्यास करण्याचे काम होते. मी अभ्यास करून ती माहिती आमच्या सैन्याला पुरविली. ही नोंद घेण्यासारखी वस्तुस्थिती आहे की वीस वर्षे लढूनही अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला आमच्याविरुद्ध युद्ध जिंकता आले नाही. आणि त्याचे श्रेय शिवाजीमहाराजांच्या गनिमी काव्याला आहे.

''उरी ध्येयज्वाला असे पेटलेली ।
अशाना कधी लागती ना मशाली ।
रवी नित्य सेवे विना तेल वात ।
अशांची शिवाजी असे जन्मजात ।
कशासाठी आणि जगावे कसे मी ।
विचारा असा प्रश्न स्वत:लाच नेहमी ।
जगु पांग फेडावया मायभूचे ।
आम्ही मार्ग चालू जिजाऊसुताचे ।।
आम्ही मार्ग चालू जिजाऊसुताचे ।।''

अध्यक्षीय भाषणानंतर, आभारप्रदर्शन आणि वरयाचना पठण होऊन सभेचा कार्यक्रम समाप्त झाला.

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. | Visit us at https://swamisamarth.com/dervan/

**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०